




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४६। किंमत - २ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । बुधवार । १७/०६/२०२६ । पाने - ६







# दोन वर्षांत शिर्डीला काय मिळाले ?
## उत्कर्षा रूपवतेंचा खा. वाकचौरेंना टोला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिर्डी लोकसभा मतदारसंघातील जनतेने ज्या विश्वासाने आणि अपेक्षेने खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना निवडून दिले, त्या अपेक्षांची पूर्तता करण्यात ते पूर्णपणे अपयशी ठरल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश प्रवक्त्या उत्कर्षा रूपवते यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाला दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे खासदारांच्या कामगिरीचा जाहीर पंचनामा करत अनेक प्रश्न उपस्थित केले.



रूपवते म्हणाल्या की, ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीच्या निकालाला दोन वर्षे पूर्ण झाली. या कालावधीत मतदारसंघात कोणती विकासकामे झाली, कोणत्या प्रश्नांना न्याय मिळाला आणि निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कितपत झाली, याचा लेखाजोखा खासदारांनी जनतेसमोर ठेवणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात अशी कोणतीही माहिती जनतेसमोर आलेली नाही.

त्यांनी सांगितले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीरनाम्यात अनेक महत्त्वाची आश्वासने देण्यात आली होती. त्या आश्वासनांची सद्यस्थिती काय आहे, कोणती कामे मार्गी लागली आणि कोणती प्रलंबित आहेत, याबाबत खासदारांनी किंवा त्यांच्या टीमने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक होते. पाच वर्षांत सर्व कामे पूर्ण होणे शक्य नसले, तरी प्रामाणिकपणे कामाचा आढावा जनतेसमोर मांडणे हे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशातील अनेक विरोधी पक्षांचे खासदार विविध सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडताना दिसतात. मात्र, शिर्डीचे खासदार महिलांवरील अत्याचार, दलितांवरील अन्याय किंवा मतदारसंघाशी संबंधित गंभीर प्रश्नांवर संसदेत प्रभावीपणे बोलताना दिसले नाहीत, अशी टीकाही रूपवते यांनी केली.

'ऑपरेशन टायगर' सारख्या राजकीय घडामोडींमध्ये खासदारांचे नाव सातत्याने चर्चेत असते. मात्र, शिर्डी लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न, विकासकामे आणि जनतेच्या मूलभूत अडचणी यासाठी त्यांनी संसदेत आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले नाही. ही बाब मतदारसंघासाठी दुर्दैवी असल्याचे रूपवते यांनी म्हटले. शिर्डी मतदार संघातील महिला, युवक, शेतकरी, कष्टकरी, अल्पसंख्यांक व सर्वच वंचित घटकांसाठी विद्यमान खासदारांनी नेमके काय काम केले. याचा कुठलाही पुरवा सध्या उपलब्ध नाही.

खासदारांच्या कार्यकाळातील अजून तीन वर्षे शिल्लक असून त्यांनी राजकीय समीकरणे आणि सत्तेच्या चर्चांमध्ये अडकून न पडता, जनतेच्या विकासासाठी आणि मतदारसंघाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पूर्ण ताकदीने काम करावे, असे आवाहन उत्कर्षा रूपवते यांनी शेवटी केले.

# आयोध्या राम मंदिर देणगी चोरी प्रकरणी एसआयटीकडून चौकशी सुरू

आयोध्या (वृत्तंसस्था)

अयोध्या राम मंदिरात देणगी चोरी प्रकरणाचा तपास वेगाने सुरू झाला आहे. मंगळवारी दुसऱ्या दिवशी विशेष तपास पथक तपासासाठी मंदिरात पोहोचले. त्यांच्यासोबत अयोध्या जिल्हाधिकारी शशांक त्रिपाठी आणि डॉ. गौरव ग्रोवर देखील आहेत. या पथकाने मंदीरातील चोरी प्रकरणी सखोल तपास सुरू केला आहे.



पहिल्या दिवशी सोमवारी ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांच्याकडून देणगी चोरीबाबत माहिती घेतली होती. याव्यतिरिक्त, एसआयटीने ट्रस्ट सदस्य गोपाल राव यांच्याकडे चौकशी केली. पथकाने ४२ संशयित कर्मचाऱ्यांचीही चौकशी केली होती. देणगी चोरी प्रकरणात अद्याप कोणतीही एफआयआर दाखल झालेली नाही. आज म्हणजेच मंगळवारी या प्रकरणात दोन एफआयआर दाखल होऊ शकतात. धर्मसेनेचे संस्थापक संतोष दुबे यांनी राम जन्मभूमी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे, परंतु अद्याप एफआयआर दाखल झालेली नाही.

याव्यतिरिक्त, यूपी युवा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष शरद शुक्ला दुसरी एफआयआर दाखल करू शकतात. जेणेकरून एकही दोषी सुटू नये. सूत्रांनुसार, एसआयटीने सोमवारी सर्वात आधी चंपत राय यांच्याकडून चौकशीची माहिती घेतली. त्यानंतर एका-एका संशयिताची बंद खोलीत चौकशी केली. मंदिराच्या सुरक्षा अधिकाऱ्यांकडून एसआयटीने हे देखील विचारले की, कर्मचाऱ्यांची बाहेर जाताना तपासणी होत होती की नाही. चौकशीत समोर आले आहे की कर्मचाऱ्यांच्या मंदिर परिसरात प्रवेश करताना तपासणी केली जात होती, पण बाहेर पडताना त्यांची झडती घेतली जात नव्हती. देणगी चोरी प्रकरणात आतापर्यंत ५ लोकांची नावे समोर आली आहेत - लवकुश, अवनीश, अनुकल्प, करुणे आणि रामशंकर. या लोकांच्या माहितीनुसार आतापर्यंत २ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. हे सर्व दान केलेल्या रकमेच्या मोजणीच्या कामाशी संबंधित आहेत. लवकुश आणि अनुकल्प पोलीस कोठडीत आहेत.

आयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणग्यांची चोरी काही नवीन नाही. धर्मसेनेचे संस्थापक संतोष दुबे यांचा दावा आहे की, १९८९ मध्ये अनेक गाव, शहरे व देश - विदेशातून पूजित होऊन अयोध्येत आलेल्या सोने-चांदी, हिरे-माणिक आणि अष्टधातूच्या १२५० शिळा आता 'गायब' झाल्या आहेत.




# राजूरचे सरपंच पुष्पा निगळे अपात्र

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील राजकीय दृष्टी महत्वाचे गाव असणाऱ्या राजूर च्या सरपंच पुष्पा निगळे यांची भ्रष्टाचाराचे कारणावरून सरपंच पदावरून अपात्र करण्यात आले .पुष्पा निगळे यांना ग्रामपंचायतीच्या विद्यमान कार्यकाळा कारिता सरपंच व सदस्य पदावरून काढून टाकण्यात येत असल्याचा आदेश विभागीय आयुक्त ,नाशिक यांनी दिला आहे.

राजूर हे विद्यमान तसेच माजी आमदारांचे गाव आहे.चार वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)पक्षाचे आमदार डॉ.किरण लहामटे गटाच्या पुष्पा निगळे यांनी भाजप चे माजी आमदार वैभव पिचड गटाच्या शोभा देशमुख यांचा चुरशीच्या लढतीत १९ मतांनी पराभव करीत निसटता विजय मिळवित पिचड यांची राजूर ग्रामपंचायतीमधील अनेक वर्षांची मक्तेदारी मोडीत काढली होती.मात्र आता भ्रष्टाचाराचे आरोपावरून त्यांना सरपंचपद गमवावे लागले हा लहामटे गटाला मोठा धक्का आहे.राजकीय दृष्ट्या महत्वाच्या गावातील सरपंचाला भ्रष्टाचाराचे आरोपावरून पद गमवावे लागण्याची तालुक्यातील ही पहिलीच घटना आहे.

सरपंच निगळे यांचा सरपंच पदाचा कारभार तसा पहिल्यापासूनच वादग्रस्त ठरत आला आहे.वेळोवेळी त्यांच्यावर अनेक आरोप झालेले आहेत.शिवसेना (ठाकरे) पक्षाचे संतोष मुतडक यांनी माहितीच्या अधिकारात ग्रामपंचायत गैर कारभाराबाबत बरीच माहिती जमा केली होती.त्या नंतर त्यांनी भ्रष्टाचाराबाबत तक्रार केली होती.या तक्रारीच्या अनुषगाने जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमून तक्रारीची चौकशी केली.या चौकशी मधील निष्कर्षाच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांकडे सरपंच निगळे यांचेवर अपात्रतेची कारवाई करणेबाबत चौकशी आदेशाची मागणी केली होती.ग्रामनिधी,१५ बा वित्त आयोग निधी,पाणीपुरवठा योजना व ५ टक्के पेसा योजना या मधून विकास कामांवर खर्च करताना चा संशयित अपहार हे या प्रकरणातील दोषारोप होते.

विभागीय आयुक्त नाशिक यांचे पुढे या प्रकरणाची अंतिम सुनावणी झाली. विविध प्रकरणातील अपहार आणि/ किंवा अनियमितता यांचा संशयित अपहार रक्कम १ कोटी २ लाख ३९ हजार १३६ रुपये आणि कायम स्वरुपी अपहार रक्कम १२ लाख ५० हजार ४१५ रुपये अशी एकूण १ कोटी १४ लाख ८९ हजार ५५१ रुपये इतकी आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रस्तावानुसार सरपंच निगळे या वरील कायम स्वरुपी अपहार व संशयित अपहार यास जबाबदार असून त्यांनी त्यांची कर्तव्ये पार पाडताना गैरवर्तणूक केल्याचे आणि सरपंचाची कर्तव्ये पार पाडण्यात दुराग्रहाने हेळसांड केल्याने त्यांना पदावरून काढून टाकने योग्य राहील असे विभागीय आयुक्तांनी आपले निकाल पत्रात नमूद केले आहे. व त्यांना सरपंच तसेच सदस्य पदावरून काढून टाकण्याचा निर्णय दिला आहे. या निर्णयाने अकोल्याच्या राजकीय जीवनात खळबळ निर्माण झाली आहे.

# खांडगावच्या विकासाचा आधारवड - रमेश लहानुभाऊ गुंजाळ



गावाचा विकास हा केवळ शासनाच्या योजनांवर होत नसतो, तर गावासाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या निस्वार्थी कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वावर तो उभा राहत असतो. संगमनेर तालुक्यातील खांडगावच्या विकासाचा इतिहास लिहायचा झाला, तर रमेश लहानुभाऊ गुंजाळ यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणे म्हणजे खांडगावच्या विकासगाथेलाच सलाम करण्यासारखे आहे.

रमेशभाऊंना समाजसेवा, सहकार आणि लोकहिताचा वारसा त्यांचे वडील लहानुभाऊ गुंजाळ यांच्याकडून लाभला. लहानुभाऊंनी खांडगावच्या प्रगतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्याच विचारांचा आणि कार्याचा वसा समर्थपणे पुढे नेत रमेशभाऊंनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला झोकून दिले आहे.

खांडगावमधील अनेक संस्था आज यशस्वीपणे कार्यरत आहेत. या संस्थांच्या उभारणी, विस्तार आणि बळकटीकरणामध्ये रमेशभाऊंचे मोलाचे योगदान राहिले आहे. खांडेश्वर देवस्थान ट्रस्ट, खांडेश्वर सहकारी दूध उत्पादक संस्था, मथुराबाई सहकारी दूध उत्पादक संस्था, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, गृहलक्ष्मी महिला सहकारी दूध उत्पादक संस्था, शिवकृपा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था तसेच ग्रामपंचायत खांडगाव या संस्थांच्या प्रगतीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. संस्था केवळ चालाव्यात एवढेच नव्हे, तर त्या अधिक सक्षम, स्वावलंबी आणि लोकाभिमुख व्हाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. आज या संस्था खांडगावच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचे भक्कम आधारस्तंभ ठरल्या आहेत.

ग्रामीण विकासासाठी सहकार हे प्रभावी माध्यम असल्याची जाणीव रमेशभाऊंना होती. त्यामुळे दूध संस्था आणि पतसंस्थांच्या माध्यमातून शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिक आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विशेषतः त्यांच्या नेतृत्वाखाली लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने मोठी गरुडझेप घेतली आहे. संस्थेने ५० कोटी रुपयांच्या ठेवींचा ऐतिहासिक टप्पा गाठला असून ग्रामीण भागातील अनेक युवकांना व्यवसाय, शेती आणि उद्योजकतेसाठी आर्थिक पाठबळ मिळाले आहे. अनेक कुटुंबांच्या आर्थिक प्रगतीमागे या संस्थेचे योगदान असून त्यामागे रमेशभाऊंचे दूरदृष्टीचे नेतृत्व ठळकपणे दिसून येते. रमेशभाऊंच्या मागे मोठा युवा वर्ग एकवटलेला दिसतो. तरुणांची संघटना कशी उभी करावी आणि त्यांना समाजकारणाची दिशा कशी द्यावी, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

केवळ राजकीय स्वार्थासाठी नव्हे, तर समाजाची अस्मिता जपण्यासाठी त्यांनी खांडेश्वर तरुण मंडळाची स्थापना केली. या माध्यमातून अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांना चालना मिळाली. युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याचे आणि समाजहितासाठी काम करण्याचे संस्कार त्यांनी रुजवले.

खांडेश्वर देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून त्यांनी धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. गावाच्या श्रद्धास्थान असलेल्या खंडेश्वर देवस्थानच्या विकासासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. खांडेश्वर अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य आयोजन आणि नियोजन गेली अनेक वर्षे त्यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पार पडत आहे. या उपक्रमामुळे गावातील सामाजिक सलोखा, अध्यात्मिक वातावरण आणि सांस्कृतिक एकात्मता अधिक दृढ झाली आहे. खांडगावच्या डोंगररांगांवर आज दिसणारी लाखो झाडे ही केवळ निसर्गाची देणगी नसून अनेक समाजसेवकांच्या अथक परिश्रमांचे फळ आहे. या वृक्षलागवड चळवळीत रमेशभाऊंचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. डोंगर हिरवेगार व्हावेत, पावसाचे प्रमाण वाढावे, भूजल पातळी सुधारावी आणि पुढील पिढीला समृद्ध पर्यावरणाचा वारसा मिळावा या उद्देशाने त्यांनी लोकांना वृक्षलागवडीसाठी प्रेरित केले. आज त्याचे सकारात्मक परिणाम संपूर्ण परिसर अनुभवत आहे.

मोठेपणा पदात नसतो, तर माणुसकीत असतो याची प्रचिती रमेशभाऊंच्या व्यक्तिमत्त्वातून येते. सभ्यता, सुसंस्कृतपणा, नम्रता आणि सर्वसामान्यांप्रती असलेला जिव्हाळा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कोणत्याही पदाचा गर्व न बाळगता सामान्य माणसांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची त्यांची वृत्ती त्यांना लोकांच्या मनात विशेष स्थान मिळवून देते. प्रसिद्धीपेक्षा समाजहिताला प्राधान्य देत त्यांनी आपला कार्यप्रवास सुरू ठेवला आहे.

रमेश लहानुभाऊ गुंजाळ हे आज खांडगावसह संपूर्ण संगमनेर तालुक्यात जनसामान्यांशी घट्ट नाळ जोडलेले प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. समाजकारण आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील प्रश्न सोडविणे, शेतकऱ्यांच्या अडचणी मांडणे आणि विकासकामांसाठी सातत्याने प्रयत्न करणे ही त्यांची कार्यशैली राहिली आहे. लहानुभाऊ गुंजाळ यांचा निस्वार्थी सामाजिक आणि राजकीय वारसा त्यांनी दुप्पट ताकदीने पुढे नेला आहे. त्यांच्या कार्यामुळे खांडगावच्या विकासाला नवी गती मिळाली असून पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचा आदर्श निर्माण झाला आहे.

**वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा**

**आज रमेशभाऊंच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी आयुष्य लाभो. त्यांनी यापुढेही समाजसेवा, सहकार, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकासाच्या कार्यातून खांडगावसह संपूर्ण तालुक्याला दिशा देत राहावे, हीच सर्व खांडगावकरांची सदिच्छा. त्यांच्या कार्याचा प्रवास पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरो, हीच वाढदिवसानिमित्त कृतज्ञ अभिवादनाची भावना.**

**- संदीप गवराम गुंजाळ**
प्रगतशील शेतकरी

# 'एल-निनो'च्या पार्श्वभूमीवर पाण्याचे काटेकोर नियोजन करा - जिल्हाधिकारी



अहिल्यानगर - 'एल-निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करावे. शासनाच्या २०१८ च्या निर्णयानुसार पिण्याच्या पाण्याचे आरक्षण प्राधान्याने राखून कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत पाणी उपसा तात्काळ थांबवावा. आवश्यकतेनुसार अशा ठिकाणांवरील वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'एल-निनो'चा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांबाबत आयोजित तातडीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासन अधिकारी डॉ.प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.विरेंद्र बडदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच कृषी, जलसंपदा, महापालिका व महसूल विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठी देण्यात येणारे पाणी आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे. जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी तात्काळ भरारी पथके नियुक्त करावीत. कालवे व बॅकवॉटर क्षेत्रात सुरू असलेला अनधिकृत पाणी उपसा त्वरित बंद करावा. आवश्यकतेनुसार संबंधित विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. महापालिका, नगरपालिकांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागात उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच जलसंपदा विभागाच्या मुख्य व कार्यकारी अभियंत्यांनी विद्यमान पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असे त्यांनी सांगितले. कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक किफायतशीर व पाणी बचतीचे ठरत असेल, तर त्या पर्यायाची तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करावी, असे निर्देशही श्री.आशिया यांनी बैठकीत दिले.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे. जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्याशिवाय व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे. उताराव आडवी पेरणी करण्याबाबत जनजागृती करावी. जिल्ह्यात खते व बियाण्यांची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र खतांचा काळाबाजार, लिंकिंग तर होत नाही ना याची कृषी विभागाने भरारी पथकांच्या माध्यमातून तपासणी करावी. खत व बियाणे पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी आणि 'डिजिटल पीक पाहणी' मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या.

# आश्वी खुर्द शिवारातून 5 एचपीची विद्युत पाणबुडी मोटार चोरीला

## अज्ञात चोराविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी खुर्द - येथील शेतकरी प्रदीप नामदेव वाल्हेकर यांच्या शेतातील विहिरीवरून अज्ञात चोरट्याने ५ एचपी क्षमतेची विद्युत पाणबुडी मोटार वायर कापून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रदीप नामदेव वाल्हेकर (वय ६३, रा. आश्वी खुर्द) हे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास असून शेती व्यवसाय करतात. आश्वी खुर्द येथील गट नं. ११ मधील त्यांच्या शेतातील विहिरीवर त्यांनी ओ ५ व्ही जी ए आर (ज५ त-र्‍रीव) कंपनीची ५ एचपी क्षमतेची विद्युत पाणबुडी मोटार बसवली होती.

दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास त्यांनी विहिरीवरील मोटार चालू करून पिकांना पाणी भरले होते. पाणी भरून झाल्यानंतर मोटार बंद करून ते घरी निघून गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी, म्हणजेच १३ जून २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास वाल्हेकर हे शेतात चक्कर मारण्यासाठी गेले असता, त्यांना विहिरीतील पाणी उपसण्याची पाईप रिकामा दिसला.

त्यामुळे संशय आल्याने त्यांनी विहिरीत खात्री केली असता, त्यांना बसवलेली विद्युत पाणबुडी मोटार दिसून आली नाही. अधिक जवळ जाऊन पाहणी केली असता, चोरट्याने मोटारीची केबल आणि पाईप कापून ती विहिरीतून चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. वाल्हेकर यांनी परिसरात सर्वत्र शोध घेतला, परंतु मोटार मिळून आली नाही. अखेर दिनांक १४ जून २०२६ रोजी त्यांनी आश्वी पोलीस ठाण्यात गाठून रीतसर फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड), २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये अदखलपात्र गुन्ह्याची (छउठ छे. ०२७९/२०२६) नोंद केली आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक (-झख) सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली आश्वी पोलीस करत आहेत. परिसरात शेती पंपांच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याने शेतकरी वर्गातून चिंता व्यक्त होत असून, अचानक मोटर चोरीमुळे व सध्या पावसाळा लांबल्याने पिकांना पाणी देण्यासाठी अडचण निर्माण होते ज्यामुळे उभे पिक जळून जाते त्यामुळे पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे.

# स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथे आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संचालिका व संस्थापिका डॉ. संज्योत वैद्य मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मल्लखांब पूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी पोल मल्लखांब, दोरी मल्लखांब तसेच विविध योगासने आणि कौशल्यपूर्ण कसरतींचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने उपस्थित शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांची मने जिंकली.

यावेळी डॉ. संज्योत वैद्य मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मल्लखांब हा भारताचा प्राचीन आणि गौरवशाली खेळ असून तो शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता, संतुलन आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक खेळांचे जतन करून त्यामध्ये प्राविण्य मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन क्रीडा विभाग आणि मल्लखांब प्रशिक्षक प्रतीक डावखरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले.

# कासारा दुमाला काशेश्वर विद्यालयात प्रवेशोत्सव व पुस्तक वितरण सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मानव विकास मंडळ संचलित काशेश्वर विद्यालय, कासारा दुमाला येथे इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गांमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागताचा तसेच पाठ्यपुस्तक वाटपाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव विकास मंडळाचे अध्यक्ष तथा स. म. भाऊसाहेब थोरात अमृतवाहीनी सहकारी बँकेचे संचालक बाळासाहेब वाळके हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून स. म. भाऊसाहेब थोरात अमृतवाहीनी सहकारी बँकेचे चेअरमन सुधाकरजी जोशी तसेच व्हाइस चेअरमन ड. नानासाहेब शिंदे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, शिस्त, परिश्रम आणि उच्च ध्येय ठेवून वाटचाल करण्याचे आवाहन केले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करताना त्यांनी शैक्षणिक जीवनातील विविध संधींची माहिती देत विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते झालेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी तसेच मानव विकास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालय व संस्थेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

Happy Birthday



मा. श्री. संकेत लोंढे पाटील
जिल्हाध्यक्ष– नवनिर्माण विद्यार्थी सेना अहिल्यानगर
संचालक– फिटनेस आणि हेल्थ क्लब संगमनेर
शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# राज्याचे पावसाळी अधिवेशन 22 जूनपासून सुरु होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी आज मुंबईत पार पडलेली 'कामकाज सल्लागार समितीची' महत्त्वाची बैठक आता संपली आहे. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे. या तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.सध्या राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफी, आगामी निवडणुका आणि राजकीय घडामोडी पाहता हे तीन आठवड्यांचे पावसाळी अधिवेशन अत्यंत वादळी ठरण्याची शक्यता आहे. विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याची तयारी केली असून, सत्ताधारी पक्ष देखील विरोधकांना चोख उत्तर देण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे २२ जूनपासून मुंबईत हायव्होल्टेज राजकीय रणसंग्राम पाहायला मिळणार आहे.शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये काँग्रेस आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

# सह्याद्री विद्यालयात नवगत विद्यार्थ्यांचे नगराध्यक्ष मैथिली तांबे यांच्याकडून स्वागत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आज नुकतीच नव्याने शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली असून सह्याद्री विद्यालयात नवगत विद्यार्थ्यांचे नगराध्यक्ष सौ मैथिलीताई तांबे यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तक देऊन उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले.

शालेय जीवन हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. बालपणीच्या अनेक आठवणी विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणात असतात. त्याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत व्हावे म्हणून सह्याद्री विद्यालयाच्या वतीने स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष मैथिली तांबे, विद्यालयाचे प्राचार्य मा. एस. एम. खेमनर, उपप्राचार्या श्रीमती एस.एन. दिघे, पर्यवेक्षक के.डी. देशमुख, पर्यवेक्षिका श्रीमती एस.आर. रणशुर, शिक्षक प्रतिनिधी ए.एम. गुंजाळ, नगरसेवक अमोल गुंजाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सौ मैथिली तांबे म्हणाल्या कि, शाळा हे विद्यार्थ्यांचे दुसरे घर असते. शहरातून आलेल्या विद्यार्थ्यांनीही संगमनेरच्या मातीत रुळावे. सह्याद्री विद्यालय हे संगमनेरचे भूषण असून येथून अनेक कर्तृत्ववान व्यक्ती घडल्या आहेत. चुका झाल्या तरी खचू नका, कारण चुकांमधूनच शिकायला मिळते. मोबाईल व टीव्हीचा वापर मर्यादित ठेवा. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक मैदानी खेळ व एक छंद जोपासावा. योग्य आहार व पुरेशी झोप यामुळे शरीर व मनाचा विकास होतो. त्यांनी पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन करून विद्यालयात सुरक्षित व आनंददायी वातावरण असल्याचे नमूद केले.

एस.एम. खेमनर म्हणाले की, सहकार महर्षी आदरणीय भाऊसाहेब थोरात (दादांनी) बहुजन समाजाच्या मुलांसाठी या संस्थेची स्थापना केली. लोकनेते बाळासाहेब थोरात , मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची व विद्यालयाची प्रगती चालू आहे. विद्यालयाच्या अडचणी सोडविणे कामी आ. सत्यजित दादा तांबे यांचे सहकार्य लाभते. नगराध्यक्ष मैथिलीताई तांबे व एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांचेही मोलाचे सहकार्य मिळत असते .या विद्यालयामध्ये पाचवी ते दहावी पर्यंत २००० पेक्षा जास्त मुलं शिक्षण घेतात. इथे मुलांची गुणवत्ता व संस्कार यांना महत्त्व दिले जाते. नव्या विद्यार्थ्यांमुळे विद्यालयाला नवी ऊर्जा मिळते. प्रत्येक विद्यार्थ्यामधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्याला वाव देण्याचे काम इथले शिक्षक सदैव करत असल्याचेही ते म्हणाले.

Happy Birthday



मा. श्री. रमेश लहानुभाऊ गुंजाळ
संचालक, स.म. भा. थो. सहकारी साखर कारखाना
शुभेच्छुक -
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत शालेय साहित्य पोहोचवा- आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शाळेचा पहिला दिवस आहे. पुढील आठ दिवसांत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत शालेय साहित्याचे वाटप पूर्ण झाले पाहिजे. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळे तील एकही विद्यार्थी शालेय साहित्या पासून वंचित राहिला नाही पाहिजे याची शिक्षणविभागाने दक्षता घ्यावी असे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी देत महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाच्यावतीने 'शाळा प्रवेशोत्सव' अभियानां तर्गत जांबुत बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेत आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले त्या वेळी आयोजित कार्यक्रमात आमदार खताळ बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, भाजप जेष्ठ नेते बाळासाहेब खेमनर, भाजप तालुका अध्यक्ष गुलाब भोसले, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष राऊफ शेख, शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख संदीप खिलारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजू कातोरे, ॲड. अमित धुळगंड, किशोर खेमनर, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, जांबुत जिल्हा परिषद शाळेत परिसरातील आदिवासी वाडी-वस्त्यांवरील तसेच गोरगरिब कुटुंबांतील मुले शिक्षणा साठी येतात. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची खरी गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे सुनेत्रा पवार शिक्षणमंत्री दादा भुसे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्य पुस्तके, बूट, सॉक्स तसेच अन्य शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले जात असते. मात्र काही ठिकाणी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही याची खंत आमदार खताळ यांनी व्यक्त केली

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमुळे शाळेची पटसंख्या आज टिकून आहे त्यामुळे त्यांना दर्जेदार शिक्षण देणे ही शिक्षकांची फार मोठी जबाबदारी आहे याच शाळेतून गोरगरिबांचे विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात शिक्षण क्षेत्रात तसेच प्रशासकीय क्षेत्रात जाऊन या गावाचे नाव उज्वल करतील असा विश्वास आमदार खताळ यांनी व्यक्त केला

**संगमनेर तालुक्यातील जांबुत बुद्रुक जिल्हा परिषदेच्या शाळेत अनेक त्रुटी निदर्शनास आल्या त्या सर्व त्रुटी दूर करण्याबाबत आ. अमोल खताळ यांनी पंचायत पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांना देत कार्यक्रमात त्रुटी ठेवणाऱ्या मुख्याध्यापकांवर कारवाई करा असे सक्त निर्देश आमदार खताळ यांनी गट शिक्षणाधिकाऱ्यांना दिले . त्यावर त्रुटी मान्य करत गटशिक्षणाधिकारी गुंड यांनी दिलगिरी व्यक्त केली. राहिलेल्या सर्व त्रुटी तातडीने दूर करण्यात येतील. शासनाच्या सर्व योजना विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी शिक्षण विभाग कटिबद्ध राहील असे संगमनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांनी सांगितले.**

# सुकेवाडी येथे कृषिकन्यांचे स्वागत




युवावार्ता


सुकेवाडी (ता. संगमनेर) येथे श्रमशक्ती कृषी महाविद्यालयाच्या कृषिकन्यांचे स्वागत करण्यात आले. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची व विविध उपक्रमातून शेती आणि झाडांच्या रोगांवरची सविस्तर माहीती देण्यात आली. कृषिकन्यांनी पर्यावरण दिनांनिमित्त कार्यक्रम राबवण्यात पर्यावरणाचे कसे संतुलित राहावे आणि काळजी कशी घ्यावी या बद्दल माहिती दिली . सर्व शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना पर्यायवरणाचे महत्त्व सागितले झाडे लावा आणि पक्ष्यांना पाणी देण्याच उपक्रम राबवला. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना कृषी शिक्षण नविन तंत्रज्ञानाची माहिती दिली. या विद्यार्थीनीनी शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीनी शेती करण्याचे महत्व समजून सागितले. शेतीतील विविध रोग व किंटकावर कसे नियंत्रण करणे याबद्दल माहिती दिली. सरपंच सौ. योगिता सातपुते यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. यावेळी उपसरपंच सुभाष कुटे तसेच ग्रामसेवक पाडूरंग सोनवणे यांनी सर्वांनी सहकार्य केले. कृषिकन्यांना मार्गदर्शन प्राचार्य डॉ. साकोरे सर व प्राध्यापक ए. डी. गुंजाळ यांनी केले.

कृषीकन्या सोनावणे कीर्ती, पगारे कावेरी, टोके सिद्धी, तळोले वैष्णवी, धोंगडे प्रतीक्षा, राठोड प्रणीती यांच्या मदतीने पर्यावरणाची सुरक्षा कशी राखून ठेवावी हे गावकऱ्यांना समजून सांगितले.

# गोपाळ गणेश आगरकर : विचारस्वातंत्र्य, विज्ञाननिष्ठा, समाजसुधारणेचे प्रखर पुरस्कर्ते

## पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेतील एक तेजस्वी विचारवंत, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि निर्भीड पत्रकार म्हणून गोपाळ गणेश आगरकर यांचे नाव आदराने घेतले जाते. आपल्या अल्पायुष्यात त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, रूढी-परंपरा आणि सामाजिक विषमता यांच्याविरुद्ध निडरपणे संघर्ष केला. १७ जून १८९५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील टेंभू या गावात झाला. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासूनच त्यांना ज्ञानाची प्रखर ओढ होती. उच्च शिक्षण घेतल्यानंतर समाजप्रबोधन आणि शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याचा त्यांनी दृढ संकल्प केला.




आगरकर हे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे समकालीन आणि सहकारी होते. दोघांनी मिळून १८८० मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल' या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. पुढे 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' आणि 'फर्ग्युसन महाविद्यालय' यांच्या उभारणीतही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उपलब्धता यासाठी त्यांनी आयुष्य वाहून घेतले.

पत्रकारितेच्या माध्यमातून समाजजागृती करण्याचे कार्यही त्यांनी प्रभावीपणे केले. सुरुवातीला ते 'केसरी' या वृत्तपत्राचे संपादक होते. पुढे वैचारिक मतभेदांमुळे त्यांनी स्वतंत्रपणे 'सुधारक' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्रातून त्यांनी अंधश्रद्धा, जातीय विषमता, बालविवाह, स्त्रियांची दुर्दशा आणि धार्मिक कर्मकांड यांवर कठोर प्रहार केले. त्यांच्या लेखनात तर्कशुद्धता, विज्ञाननिष्ठा आणि समाजहिताची जाणीव यांचा उत्कृष्ट संगम दिसून येतो. आगरकर हे स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि सामाजिक समतेचे कट्टर समर्थक होते. समाजातील परिवर्तनासाठी केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरेसे नसून सामाजिक सुधारणाही तितक्याच आवश्यक आहेत, असे त्यांचे मत होते. म्हणूनच त्यांनी सामाजिक प्रश्नांना अग्रक्रम दिला. त्यांच्या विचारांनी महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीला नवी दिशा आणि नवे बळ मिळाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रामाणिक, तत्त्वनिष्ठ आणि निर्भीड होते. लोकप्रियतेपेक्षा सत्याला त्यांनी अधिक महत्त्व दिले. समाजातील चुकीच्या प्रथा, अज्ञान आणि अन्यायाविरुद्ध त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. परिणामी त्यांना अनेकदा टीका आणि विरोधाचा सामना करावा लागला; परंतु त्यांनी आपल्या विचारांपासून कधीही माघार घेतली नाही.

# राजमाता जिजाऊ : हिंदवी स्वराज्याच्या पायाभरणीतील सर्वात मोठे योगदान

## पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

राजमाता जिजाऊ या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री आणि हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेच्या प्रमुख प्रेरणास्थान होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात धैर्य, दूरदृष्टी, राष्ट्रप्रेम, धर्मनिष्ठा आणि मातृत्वाचा विलक्षण संगम पाहायला मिळतो. त्यांनी केवळ एका पुत्राला जन्म दिला नाही, तर संपूर्ण राष्ट्राला स्वाभिमानाचा मार्ग दाखविणारा महान राजा घडविला. १७ जून १६७४ रोजी पाचाड येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे स्वराज्याच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या अध्यायाचे स्मरण करणे होय.

जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेडराजा येथे झाला. त्यांचे वडील लखुजीराजे जाधव हे निजामशाहीतील पराक्रमी सरदार होते. जाधव घराण्यातील शौर्य, स्वाभिमान आणि न्यायप्रियतेचे संस्कार जिजाऊंना बालपणापासून लाभले. त्या बुद्धिमान, धर्माभिमानी आणि कर्तव्यदक्ष होत्या. त्यांचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला. विवाहानंतर त्यांनी अनेक राजकीय



उलथापालथी, युद्धे आणि संकटांचा सामना केला. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्यांनी आपला धीर सोडला नाही. त्या काळात देशावर परकीय सत्तांचे वर्चस्व होते. जनतेवर अन्याय, अत्याचार आणि लूटमार सुरू होती. सामान्य माणसाला न्याय मिळत नव्हता. या परिस्थितीने जिजाऊंच्या मनात स्वराज्याची ठिणगी प्रज्वलित केली. त्यांनी आपल्या पुत्र शिवाजींमध्ये स्वाभिमान, शौर्य आणि राष्ट्रभक्तीची भावना जागृत केली. रामायण, महाभारत, भागवत तसेच भारतीय इतिहासातील पराक्रमी व्यक्तिमत्त्वांच्या कथा सांगून त्यांनी शिवाजी महाराजांना आदर्श राज्यकर्त्याचे धडे दिले.

अन्यायाविरुद्ध लढणे, दुर्बलांचे संरक्षण करणे आणि धर्माचे रक्षण करणे हेच राजाचे कर्तव्य असल्याचे संस्कार त्यांनी बालशिवबांवर केले. पुणे जहागिरीच्या विकासामध्ये जिजाऊंचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. मुरार जगदेवाच्या आक्रमणामुळे उद्ध्वस्त झालेल्या पुण्याला पुन्हा उभारी देण्याचे कार्य त्यांनी केले. शेती, पाणी व्यवस्थापन, न्यायदान आणि जनकल्याण यांवर त्यांनी विशेष भर दिला. लाल महालाच्या उभारणीनंतर पुणे परिसरात विकासाची नवी सुरुवात झाली. रयतेच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी त्या सदैव तत्पर असत. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल आदर आणि विश्वास निर्माण झाला. जिजाऊ केवळ माता नव्हत्या, तर त्या कुशल प्रशासक आणि दूरदर्शी मार्गदर्शकही होत्या. शिवाजी महाराज मोहिमांवर असताना अनेकदा त्यांनी प्रशासनाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. न्यायदान करताना त्या कोणताही भेदभाव करीत नसत. प्रजेचे हित आणि राज्याचे कल्याण यांनाच त्या सर्वोच्च स्थान देत. त्यामुळे त्यांना 'राजमाता' हा सन्मान मिळाला.

# संपादकीय...

## इंग्रजीचे आकर्षण आणि मातृभाषेचे वास्तव

शिक्षणाची भाषा कोणती असावी, हा प्रश्न आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. गेल्या काही दशकांपासून याबाबत समाजात, शैक्षणिक क्षेत्रात आणि विशेषतः पालकांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढती संख्या, त्यांचा झगमगाट आणि जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी भाषेचे वाढते महत्त्व यामुळे अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमालाच प्राधान्य देत आहेत. मात्र, इंग्रजी भाषा शिकणे आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, याचा विचार अनेकदा केला जात नाही. परिणामी शिक्षणाच्या माध्यमाबाबत अनेक पालकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो. आज ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे जाळे विस्तारले आहे. अनेक गरीब, कष्टकरी आणि मध्यमवर्गीय पालक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी मोठे आर्थिक त्याग करून इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश मिळवून देतात. काहीजण कर्ज काढतात, तर काहीजण इतर गरजांवर काटकसर करून शिक्षणासाठी मोठी रक्कम खर्च करतात. त्यामागील प्रमुख कारण म्हणजे इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतल्यास मुलांचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल, अशी त्यांची धारणा. परंतु केवळ शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्यामुळेच यश मिळते, हा समज वस्तुस्थितीशी पूर्णपणे सुसंगत नाही. मुलाचे पहिले शिक्षण त्याच्या घरातून आणि परिसरातून सुरू होते. जन्मापासून तो ज्या भाषेत संवाद ऐकतो, ज्या भाषेत प्रेम, माया, संस्कार आणि सामाजिक मूल्ये अनुभवतो तीच त्याची मातृभाषा असते. त्यामुळे मुलाच्या विचारप्रक्रियेचा, आकलनशक्तीचा आणि भावनिक विकासाचा पाया मातृभाषेतच घातला जातो. शिक्षण जर याच भाषेतून मिळाले, तर मुलाला विषय समजून घेणे अधिक सोपे जाते. त्याला ज्ञान आत्मसात करणे सहज शक्य होते. त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण ही केवळ भाषेची निवड नसून ती मुलाच्या सर्वांगीण विकासाची नैसर्गिक आणि प्रभावी पद्धत आहे. मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे की, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून घेतल्यास मुलांची आकलनशक्ती, स्मरणशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मुलाला जेव्हा एखादी संकल्पना स्वतःच्या भाषेत समजावून सांगितली जाते, तेव्हा ती त्याच्या मनात अधिक स्पष्टपणे रुजते. उलट परकीय भाषेतून शिक्षण घेताना त्याला प्रथम भाषा समजून घ्यावी लागते आणि नंतर विषय समजून घ्यावा लागतो. त्यामुळे शिकण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक अडथळे निर्माण होतात. मातृभाषेचे महत्त्व केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही. भाषा ही संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्यांची वाहक असते. मुलांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, नैतिक मूल्ये आणि सांस्कृतिक जाण निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मातृभाषाच करते. माय, माती, मातृभूमी आणि मातृभाषा या चार घटकांचे व्यक्तीच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. आई जन्म देते, माती जगण्याचा आधार देते, मातृभूमी सुरक्षितता आणि ओळख देते, तर मातृभाषा व्यक्तिमत्त्व घडवते. त्यामुळे मातृभाषेतील शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून संस्कारक्षम समाजनिर्मितीचे माध्यम आहे. युनेस्कोसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनीही मातृभाषेतील शिक्षणाला प्राधान्य देण्याची शिफारस केली आहे. विविध संशोधनांमधून असे दिसून आले आहे की, मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, समज आणि सहभाग हा इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी असतो. जगातील अनेक प्रगत देश आजही आपल्या मातृभाषेतून शिक्षण देतात. इंग्लंडमध्ये इंग्रजी, फ्रान्समध्ये फ्रेंच, जर्मनीमध्ये जर्मन, जपानमध्ये जपानी, चीनमध्ये चिनी आणि रशियामध्ये रशियन भाषेत शिक्षण दिले जाते. फिनलँडसारख्या उत्कृष्ट शिक्षण व्यवस्थेसाठी ओळखल्या जाणाऱ्या देशातही मातृभाषेलाच प्राधान्य दिले जाते. महात्मा गांधी यांनी मातृभाषेला शिक्षणाचे सर्वोत्तम माध्यम मानले होते. त्यांच्या मते, मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास मातृभाषेतूनच प्रभावीपणे होऊ शकतो.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिवनेरी किल्ल्यावर स्वच्छता मोहीम



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय, संगमनेर येथील विद्यार्थ्यांनी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमी असलेल्या शिवनेरी किल्ला, कुसूर येथे स्वच्छता मोहीम आयोजित केली. ही मोहीम पर्यावरण रक्षण आणि ऐतिहासिक स्थळांच्या जतनासाठी राबवण्यात आली असून, त्यात विद्यार्थ्यांनी मनापासून उत्साहाने सहभाग घेतला.

शिवनेरी किल्ला हा केवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाचा ठसा नसून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणीच्या आठवणींशी जोडलेला पवित्र स्थळ आहे. मात्र, पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे आणि इतर कारणांमुळे किल्ल्याच्या परिसरात प्लास्टिक, कचरा व इतर दूषित पदार्थ वाढले होते. याची जाणीव ठेवून सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयाने ही स्वच्छता मोहीम हाती घेतली.

मोहिमेदरम्यान विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या पायथ्यापासून ते वरच्या भागापर्यंत संपूर्ण परिसर स्वच्छ केला. प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या, कागद, पाने आणि इतर कचरा गोळा करून तो योग्य ठिकाणी टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी हातात झाडू, कचरा पिशव्या घेऊन उत्साहाने काम केले. काही विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या भिंतींना लागून असलेल्या झाडांखाली आणि खडकांमध्ये साचलेला कचरा काढला. या उपक्रमात महिला विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी यावेळी म्हणाले, शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर समाज आणि देशासाठी जबाबदारी घेणे हेही महत्त्वाचे आहे. शिवनेरीसारख्या पवित्र स्थळाचे संरक्षण करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आमचे विद्यार्थी केवळ कृषी क्षेत्रातील व्यावसायिक नव्हे तर, सामाजिक जाणीव असलेले जबाबदार नागरिक बनतील, अशी आमची अपेक्षा आहे.

प्रशासकीय अधिकारी प्रा. जी. बी. बाचकर यांनी सांगितले की, या प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण रक्षणाची आणि वारसा जतन करण्याची भावना वाढते. भविष्यात असे उपक्रम नियमितपणे घेण्याचे आमचे नियोजन आहे.

या स्वच्छता मोहिमेमुळे सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारसा, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी याविषयीची जागृती निर्माण झाली. हा उपक्रम 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'हरित महाराष्ट्र' या संकल्पनेशी सुसंगत असल्याचे मानले जाते. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय, संगमनेर हे केवळ कृषी शिक्षण देणारे महाविद्यालय नसून, सामाजिक बांधिलकी असलेली संस्था म्हणूनही ओळखले जाते. अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयाची सामाजिक प्रतिमा अधिक उजळली गेली आहे. या स्वच्छता मोहीम अभियानाचे माजी कृषी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही.बी धुमाळ, डॉ. जे बी गुरव,यांनी अभिनंदन केले आहे.

# मालपाणी विद्यालयाचा शाळा प्रवेशोत्सव उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना कुंकूम तिलक लावून तसेच पाचवीच्या विद्यार्थ्यांना स्वागतकार्ड देत बँड पथकाच्या निनादात त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यमान नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी वसंतराव वाघ, पालक प्रतिनिधी सौरभ म्हाळस व दीपिका स्वप्निल शिंदे ,भाग्यश्री बर्डे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उत्तम एरंडे होते. पर्यवेक्षिका रंजना पवार यांच्यासह मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका रंजना पवार यांनी केले. उपस्थित मान्यवरांचा परिचय व सत्कार शीतल मुर्तडक यांनी केला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करत नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी सर्व शिक्षक - शिक्षकेतर सहकाऱ्याचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बँड पथकाचे नियोजन अंबादास बुलाखे यांनी केले. सूत्रसंचालन अनुजा आभाळे यांनी केले, तर दर्शन जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

रजि १०१७१ तारीख २७.०५.१९४६

## जोर्वे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. जोर्वे

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

जा. नं. ६०/२०२६ दि. १५.०६.२०२६

### जाहीर निविदा

जोर्वे विविध कार्यकारी सेवा सह सोसायटी लि जोर्वे ता संगमनेर जि अहिल्यानगर केंद शासनाच्या जगातील सर्वात मोठी धान्य साठवणुक योजने अर्तगत मंजुर नविन गोदाम बाधकाम करावयाचे आहे. त्या करीता नोंदणीकृत ठेकेदार यांचकडुन लिफाफे पध्दतीने सिलबंद निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे. निविदा दर पत्रक अटी शर्ती व बाधकामाचा नकाशा इत्यादी बाबतची माहिती संस्थेच्या कार्यालयीन वेळेत दिनाक १७.०६.२०२६ते २४.०६.२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळतील.

| अ.न. | कामाचे नाव | निविदा फी |
|---|---|---|
| | केंद्र शासनाच्या जगातील सर्वा मोठी धान्य साठवणुक योजने अंतर्गत मंजूर नविन गोदाम बांधकाम ५०० मेट्रीक टन (नकाशाप्रमाणे) | रू १००० संस्थेच्या नावाने डि डी सोबत अथवा रोख भरणा करावा |

सदर निविदा २४.०६.२०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील सदर निविदेतील दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थेने राखुन ठेवलेला आहेत निविदा उघडण्याची प्रक्रिया दिनाक २९.०६.२०२६ सकाळी ठिक ११.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात पार पडेल. सदरच्या कामाचा व कामावरील मजुरांचा विमा, रॉयल्टी, जी एस टी भरण्याची जबादारी संबंधित ठेकेदाराची राहिल.

ठिकाण : जोर्वे
दिनांकः १५.०६.२०२६
निवीदा सोबत
१) नोदणी प्रमाणपत्र २) जी एस टी प्रमाणपत्र
३) पॅन कार्ड ४) अनुभव प्रमाणपत्र इ आवश्यक

सही
सभापती
मोबाईल नंबर ९८२२६७६२०५, ९९२१२६४२६४
जोर्वे विविध कार्यकारी सेवा सह सोसायटी लि.
ता. सगमनेर जि. अहिल्यानगर


**पाहिजेत**
माऊली ग्रीन सोल्युशन येथे कामासाठी मुले पाहिजेत
सोलर, सीसीटिव्ही, संगणक सिस्टीममध्ये तांत्रिकज्ञान आवश्यक
7588095215
7888095215

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क - 9822258458

SLH ADVISORS PVT LTD
TAX | ACCOUNTING | CONSULTING
WE ARE HIRING JOIN OUR TEAM
Marketing Executive 05
B.Com./M.Com./MBA, Salary - Rs. 25,000/-
TeleCaller (Female) 02
Graduate Preferred, Salary - Rs. 15,000/-
Digital Marketing Executive 02
Graduate, MBA, Salary - Rs. 20,000/-
SEO, Google Ads, Content Creation Experience
Contact : 7666387377
SLH Advisors Pvt. Ltd., Saish Business Park, Near Kavi Anant Fandi Natyagruha, Sangamner

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**हॉटेल अन्नपूर्णासाठी**
मेस व नाष्ट्यासाठी कुक (आचारी) पाहिजे
आकर्षक पगार मिळेल
राजश्री कृषी केंद्रा शेजारी देवगाव रोड, संगमनेर खुर्द
9011326117
7588004655

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME MOHSINABANO MOHAMMADKHAN PATHAN
NEW NAME AS MOHASINA GAYAS SHAIKH
ADD – INAMDAR NAGAR , SATRAL, AT- SATRAL, POST - SONGAONTAL- RAHURI, DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
दुकान कामासाठी पुर्ण वेळ माणसे पाहिजेत
मुले - ४ अनुभवास प्राधान्य
आकर्षक पगार दिला जाईल
- संपर्क - 9881155177

**पाहिजेत**
इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत
अकाऊंटट –३ क्लार्क –३
ड्रायव्हर–३ वॉचमन– ३
तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६









अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या

**स्त्रियांच्या समस्या**




- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैंथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य



डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )

1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त

डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13









# विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील मालदाड येथे एका २७ वर्षीय तरुणाचा विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून दुर्दैव मृत्यू झाला. ही घटना सोमवार १५ जून रोजी सायंकाळी घडली. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून शोक व्यक्त केला जात आहे.

क्षितिज भिमाजी नवले (वय २७) असे या दुर्घटनेत दुर्दैव मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. मयत क्षितीज नवले हा बँक ऑफ बडोदा, सिन्नर येथे नोकरी करत होता. रविवारी सुट्टी असल्याने तो गावी आला होता. त्यानंतर सोमवारी मालदाड येथील काशाई माता मंदिर परिसरातील एका विहिरीत पडून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत क्षितीजच्या पश्चात आई, वडील, बहिणी असा परिवार आहे. क्षितिज नेमका विहिरीत कसा पडला, की या पाठीमागे काही वेगळे कारण आहे का? याबाबत अधिक तपास तालुका पोलीस करत आहे.




# आपल्या मातीतील माणसे आपणच मोठी केली पाहिजे - इंदुरीकर महाराज

## काल्याच्या कीर्तनात उडाले हास्याचे फवारे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - एकही संत देवाकडे गेला नाही, संत हेच देव झाले. संतांनी स्वत:चे आयुष्य राखरांगोळी करून समाज सुखी केला. आपल्या मातीतील माणसे आपणच मोठी केली पाहिजेत, असे परखड प्रतिपादन ह.भ.प. निवृत्तीनाथ महाराज इंदुरीकर यांनी केले. गुंजाळवाडी येथे आयोजित स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या कीर्तनात त्यांनी आपल्या खास विनोदी, मिश्किल आणि प्रबोधनात्मक शैलीत श्रोत्यांना अक्षरशः खिळवून ठेवले.

गोकुळातील आनंदोत्सवाचे वर्णन करताना इंदुरीकर महाराज म्हणाले, भगवान श्रीकृष्णाच्या आगमनाने गोकुळात आनंदाचा अंतपार उरला नव्हता. गुढ्या तोरणे उभारली गेली होती. याच वेळी त्यांनी माणसाच्या बाह्य आणि अंतर्मनाचा वेध घेत ज्ञान, जिज्ञासा आणि विवेक यांचे महत्त्व पटवून दिले. भेद पाहत नाही तोच खरा ज्ञानी, असे सांगताना जगातील दिखाऊपणावर त्यांनी ताशेरे ओढले. जग खोटे असू शकते; पण संत, ग्रंथ, आई वडील हे खरे असतात असे सांगत त्यांनी संतपरंपरेचे महत्त्व अधोरेखित केले.

आपल्या खास शैलीत समाजातील विसंगतींवर भाष्य करताना त्यांनी विवाहसंस्था, शेती आणि बदलती मानसिकता यावरही उपरोधिक टिप्पणी केली. ८० टक्के लोकांना नोकरी करणारा आणि शेती असलेला जावई हवा असतो, पण मुलीला शेतात पाठवायचे नसते असे म्हणत त्यांनी उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटवली. लंका सोन्याची होती म्हणून माणसाला तिथे पाठवले नाही, कारण ९० टक्के माणसे बदलतात, या कोटीवर सभागृहात हास्याचे फवारे उडाले. मारुतीराया देव नाही, तर तो रक्षक आहे. प्रामाणिक माणसात मायेचा ओलावा असतो असेही ते म्हणाले.

काल्याच्या कीर्तनातील आध्यात्मिक आशय स्पष्ट करताना त्यांनी 'परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी' यांचा गर्भितार्थ उलगडून सांगितला. गोविंद, गोवर्धन, गोकुळ, गोप, गोपिका, गोमाता आदी शब्दांचे आध्यात्मिक महात्म्य विशद केले. लोक परमार्थिक अवसान आणतात, पण खरा आनंद बाहेर नसून आपल्या अंतर्मनात आहे. हसत हसत जीवनाचा आनंद घ्या असा संदेश त्यांनी दिला. आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढलेला मानसिक तणाव, रक्तदाब आणि मधुमेह यांचा उल्लेख करत मानसिक तणावावर भजन हे सर्वोत्तम औषध आहे असेही त्यांनी नमूद केले.

बहिणाबाई चौधरी, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संतपरंपरेचा गौरव करताना त्यांनी बहिणाबाई या केवळ कवयित्री नव्हत्या, तर संत होत्या. ज्ञानोबाराय हे विश्वाची माऊली आहेत असे सांगितले. स्वामी गगनगिरी महाराजांविषयी बोलताना गगनगिरी महाराज सर्वज्ञ होते. त्यांचे आई वडील आणि संपूर्ण कुळ धन्य आहे अशा शब्दांत त्यांनी गौरव केला.

सप्ताहाच्या यशस्वी आयोजनाचे कौतुक करताना इंदुरीकर महाराज म्हणाले, गुंजाळवाडीच्या सप्ताहाने विक्रम प्रस्थापित केला आहे. संगमनेर तालुक्यात छत्रपती सप्ताहाचेही आयोजन व्हायला हवे. गगनगिरी भक्तांनी उभी केलेली संघटनशक्ती व भक्तिभावाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. आमचे बोलणे अनेकदा बोचते, पण ती काळाची गरज आहे असे सांगत त्यांनी आत्मपरीक्षण, संतविचार आणि सामाजिक जागृतीचा संदेश देत काल्याच्या कीर्तनाचा समारोप केला.





















पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक **युवावार्ता**
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005




# रावसाहेब रेवजी काकड यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## मैत्री, निष्ठा आणि समाजसेवेचा जपणारा हरपलेला आधारवड



पवित्र स्मृतींची ज्योत
तेवते अखंड आमच्या मनी

सुगंध तुमच्या आदर्शांचा
दरवळतो जीवनी आठवुनी

अस्तित्व दिव्य तव वृत्ती
भारावलो कृतज्ञतेने आम्ही, अर्पितो विनम्र श्रद्धांजली.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||

संगमनेर तालुक्यातील ऐतिहासिक जोर्वे गावातील एक कर्तव्यदक्ष, मितभाषी आणि समाजहिताची जाणीव जपणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. रावसाहेब रेवजी काकड (वय ७३) यांचे ८ जून रोजी झालेल्या अपघाती निधनाने केवळ त्यांच्या कुटुंबीयांनाच नव्हे, तर संपूर्ण जोर्वे परिसराला मोठा धक्का बसला आहे. आज त्यांच्या दशक्रियाविधीनिमित्त त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा स्मरणपूर्वक आढावा घेताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळत आहेत.

रावसाहेब काकड हे नाव जोर्वे गावात आदराने घेतले जात असे. गावातील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी सातत्याने योगदान दिले. ज्येष्ठ काँग्रेस नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे ते लहानपणापासूनचे जिवलग मित्र होते. दोघेही जोर्वे गावचे सुपुत्र असल्याने त्यांची मैत्री काळाच्या कसोटीवर टिकून राहिली. ही मैत्री केवळ वैयक्तिक न राहता समाजकारण आणि विकासाच्या कामांपर्यंत विस्तारली.

स्वर्गीय सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांच्या विचारांचे ते खंदे समर्थक आणि निष्ठावंत कार्यकर्ते होते. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास व्हावा, सामान्य माणसाला आधार मिळावा आणि समाजात प्रगतीची नवी दारे खुली व्हावीत, या विचारांवर त्यांची ठाम श्रद्धा होती. भाऊसाहेब थोरात यांच्या कार्याचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे काम केले.

बाळासाहेब थोरात यांच्या प्रत्येक निवडणुकीत आणि विविध राजकीय उपक्रमांत त्यांनी खंबीरपणे साथ दिली. राजकीय लाभ किंवा पदाची अपेक्षा न ठेवता त्यांनी कार्यकर्त्याची भूमिका प्रामाणिकपणे निभावली. त्यांच्या निष्ठेची आणि समर्पणाची दखल घेत बाळासाहेब थोरात यांनीही त्यांना विविध सामाजिक आणि संस्थात्मक कार्यांमध्ये सहभागी करून घेतले. अमृत पतसंस्था, जोर्वे येथे व्हाईस चेअरमन म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. संस्थेच्या प्रगतीसाठी तसेच सर्वसामान्य सभासदांच्या हितासाठी त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.



जोर्वे गावाच्या विकासातही त्यांचा मोठा वाटा राहिला. गावात विविध विकासकामे, शैक्षणिक सुविधा, धार्मिक उपक्रम आणि सामाजिक कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला. बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून गावासाठी निधी उपलब्ध करून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे जोर्वे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळाली आणि गावाचा कायापालट घडून आला.



रावसाहेब काकड हे केवळ सामाजिक कार्यकर्ते नव्हते, तर एक कष्टाळू शेतकरीही होते. शेतीत रमणारे, मातीशी नाळ जोडून ठेवणारे आणि श्रमाला प्रतिष्ठा मानणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेकांसाठी प्रेरणादायी होते. शेती, संसार आणि समाजकार्य यांचा सुंदर समतोल त्यांनी आयुष्यभर साधला. आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊन त्यांनी कुटुंबालाही सक्षम बनवले. त्यांचे पुत्र विकास आणि विक्रम हे आपापल्या क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत, तर कन्या वीणा आणि विद्या आपल्या संसारात सुखी व समृद्ध आहेत.



त्यांच्या संस्कारांची हीच खरी ओळख आहे.

गावातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग होता. कोणाचेही संकट असो किंवा आनंदाचा प्रसंग, रावसाहेब काकड आवर्जून उपस्थित राहत. त्यामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा होता आणि समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या साधेपणाने, प्रेमळ स्वभावाने आणि मदतीच्या वृत्तीने त्यांनी असंख्य माणसे जोडली.

दुर्दैवाने, काही दिवसांपूर्वी मित्र शरद नाना थोरात आणि इतर सहकाऱ्यांसमवेत मुंबईहून परत येत असताना त्यांच्या वाहनाला अपघात झाला. या भीषण अपघातात त्यांचे निधन झाले आणि एक उमदा कार्यकर्ता, विश्वासू मित्र, कर्तव्यदक्ष सहकारी आणि प्रेमळ कुटुंबवत्सल व्यक्ती सर्वांना कायमची सोडून गेली.

आज त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते-माणूस पदाने मोठा होत नाही, तर आपल्या कार्याने आणि माणुसकीने मोठा होतो. रावसाहेब काकड यांनी आयुष्यभर याच मूल्यांची जपणूक केली. त्यांनी मागे ठेवलेला सामाजिक वारसा, जपलेली मैत्री, केलेली विकासकामे आणि माणसांवर केलेले प्रेम हेच त्यांच्या जीवनाचे खरे स्मारक आहे. अशा या बहुआयामी, निष्ठावान आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वास दशक्रियाविधीनिमित्त विनम्र अभिवादन. त्यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच प्रार्थना.

**- समस्त काकड परिवार, जोर्वे**

---

स्वर्गवास - ०८/०६/२०२६

सहवास जरी तुटला, स्मृती सुगंध देत राहिल..
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुमची आठवण येत राहिल..!

## कै. रावसाहेब रेवजी काकड

यांना

### || भावपुर्ण श्रध्दांजली ||



: शोकाकुल :

गं.भा.मंगल रावसाहेब काकड (पत्नी)

कारभारी रेवजी काकड (भाऊ) | बाबुराव रेवजी काकड (भाऊ)
विकास रावसाहेब काकड (मुलगा) | विक्रम रावसाहेब काकड (मुलगा)
भाऊसाहेब कारभारी काकड (पुतण्या) | संजय कारभारी काकड (पुतण्या)
सौ.विणा बाबासाहेब जंगले (मुलगी) | सौ.विद्या विनोद दिघे (मुलगी)
सौ.शिला केशव वर्पे (पुतणी) | डॉ.महेश बाबुराव काकड (पुतण्या)
सौ.आशा मनोहर वर्पे | गं.भा.अलका खंडेराव टेमगिरे
सौ.छाया विश्वनाथ दिघे | सौ.छाया अनिल उगले
सौ.नीता सुधीर राहणे | सौ.शरयु वैभव गवळी
सौ.कावेरी संकेत आहेर (नात) | सौ.माधवी राकेश शिंदे

सौ. शोभा ज्ञानेश्वर नाईकवाडी (पुतणी)

- दशक्रिया विधी -
बुधवार दि. १७/०६/२०२६ रोजी
सकाळी ०८.०० वा.
स्थळ :- दत्त मंदिर, जोर्वे,
ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर

**समस्त काकड परिवार व आप्तेष्ट**

-: प्रवचनकार :-
ह.भ.प. मयुरीताई शिंदे (शेटे)


दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25